**Publication: Pudhari**

**Headline: Bomb Blasts results in scare among the traders**

**Edition: All Editions**

**Date: 19th July, 2011**

**Coverage**



# बॉम्बस्फोटामुळे व्यापारी वर्गात घबराट

## सराफ बाजाराची उलाढाल तीन लाख कोटी; कडेकोट सुरक्षेची मागणी

**निशिकांत पेडणेकर**

मुंबईतील झवेरी बाजार तिसऱ्यांदा दहशतवाद्यांचे लक्ष्य ठरल्यामुळे या परिसरातील सराफ बाजारासह सर्वच व्यापारी वर्गात प्रचंड घबराट निर्माण झाली आहे. परिणामी वार्षिक तीन लाख कोटींची उलाढाल असलेल्या या विभागातील व्यापारी सरकारकडे कडेकोट सुरक्षेची मागणी करणार आहेत. त्यासाठी बॉम्बे बुलियन संघटनेचे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधी मंडळाने नुकतीच मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेतली. तसेच सराफांच्या सुरक्षेसाठी लवकरच राज्याच्या गृहमंत्र्यांची भेट घेऊन आलेल्या समस्या मांडणार आहेत.

मुंबईचे पोलीस आयुक्त अरुप पटनायक यांनाही निवेदन देण्यात येणार आहे.

१३ जुलै रोजी तिसऱ्यांदा दहशतवादी बॉम्बस्फोट झालेल्या झवेरी बाजाराच्या आसपास पंचरत्न इमारतीतील जागतिक हिराबाजार, अब्दुल रहमान स्ट्रीट, चिरा बाजार, क्रॉफर्ड मार्केट असा व्यापारी बहुल परिसर आहे. या परिसरातून वर्षाकाळी ३ लाख कोटींची उलाढाल होते. त्यातून विक्रीकराच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे ३५० कोटी रुपयांची भर पडत असते. या संपूर्ण इलाख्यात दररोज सुमारे ५०० ते १००० कोटींपर्यंत व्यापारी उलाढाल होते. इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होणाऱ्या या परिसरात कायदा व सुव्यवस्था मात्र सुमार दर्जाची किंबहुना हीन दर्जाची आहे. चिंचोळ्या व दिवसभर असलेल्या गल्ल्यात फेरीवाल्याचे साम्राज्य असून त्यावर सरकारी यंत्रणेचे पूर्ण नियंत्रण नाही. सरकारकडे गर्दी, वाहतूक आणि फेरीवाले यांबाबत कोणतेही ठोस व्यवस्थापन नाही. यामुळे अत्यंत दाटीवाटीचा हा परिसर पुन्हा दहशतवाद्यांचे सहज लक्ष ठरू शकतो. ही समस्या सरकारकडे मांडण्यासाठी व्यापारी सध्या जोरदार तयारी करीत आहेत. त्यासाठी लवकरच गृहमंत्र्यांची भेटदेखील मागण्यात आली आहे.

> सराफ बाजाराची वार्षिक उलाढाल तीन लाख कोटी
>
> विक्रीकराच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत दरवर्षी ३५० कोटी
>
> दररोज सुमारे १००० कोटींपर्यंत व्यापारी उलाढाल

व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी मंडळ प्रामुख्याने कडेकोट सुरक्षा व्यवस्था, बेकायदेशीर फेरीवाल्यांना हटविणे, शिस्तबध्द पार्किंग, बाहेरून येणाऱ्या वाहनांवर पाळत, वर्दळीवर अंकुश अशा मागण्या करणार आहे. झवेरी बाजारातील व्यापाऱ्यांची स्वत:ची वैयक्तीक सुरक्षा व्यवस्था असते. पण त्यांना एकूण परिसराच्या सुरक्षिततेसाठी सरकारकडून ठोस मदत हवी आहे. सुरक्षेप्रमाणेच फेरीवाल्यांची समस्या दूर करण्याच्या मागणीवर जोर धरण्यात येणार आहे. बॉम्बे बुलियन असोसिएशनचे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांनी ही माहिती दिली आहे.